# कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

**टोल फ्री क्रमांक - 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 04.06.2021.**

**भुमी अभिलेख कार्यालय, जालना येथील पर्यवेक्षक भुमापक श्री. माधव पांडुरंग ओगले यांना पी.आर. कार्ड वरील नावाची दुरुस्ती करुन देण्यासाठी 2,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | **आलोसेचे नाव, हुद्दा व पत्ता** | :- | लोकसेवक श्री. माधव पांडुरंग ओगले, वय 54 वर्ष व्यवसाय नोकरी पर्यवेक्षक भुमापक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय जालना रा. ए टु झेड शाळेजवळ इन्कमटॅक्स कॉलनी, जालना (वर्ग - 3) |
| 2 | **गुन्हा घडला ता व ठिकाण** | :- | दिनांक 04.06.2021 रोजी भुमी अभिलेख कार्यालय, जालना येथे |
| 3 | **लाचेची रक्कम** | :- | 2,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, सेवानिवृत कर्मचारी असुन त्यांनी जालना शहरात प्लॉट खरेदी केला होता. त्यावेळी प्लॉटचे पी.आर. कार्डवर चुकीच्या नावाची नोंद झाली होती. त्यामुळे पी.आर. कार्डवरील चुकलेल्या नावाची दूरुस्ती करण्यासाठी त्यांनी दिनांक 18.12.2020 रोजी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, जालना येथे लेखी अर्ज दिला होता. त्यानंतर तक्रारदार भुमी अभिलेख कार्यालय, जालना येथील पर्यवेक्षक भुमापक श्री. माधव ओगले यांना भेटले असता त्यांनी पी.आर. कार्डवरील चुकीच्या नावाची दूरुस्ती करुन देण्यासाठी 2,000/- रुपये व प्लॉटची मोजणी सरकारी करावयाची असल्यास कोरोनामुळे ते शक्य नाही. या अगोदरच आमच्याकडे अर्ज प्रलंबित आहेत. मी सरकारी मोजणी पण करणार, परंतु आता ते दोन एक महिने शक्य नाही. परंतु मी स्वत: खाजगीरीत्या तुमच्या प्लॅटची मोजणी पैसे दिल्यावर लगेच दुस-या दिवशी करुन देतो, असे म्हणुन त्यासाठी वेगळे 6,000/- रुपये दयावे लागतील, असे म्हणुन पी.आर. कार्डवरील चुकीच्या नावाच्या दूरुस्ती करुन देण्यासाठी 2,000/- रुपये व लॉटची मोजणी खासगीरित्या लगेच करुन देण्यासाठी 6,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 03.06.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता, भूमी अभिलेख कार्यालय, जालना येथील पर्यवेक्षक भुमापक श्री. माधव ओगले यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे पी.आर.कार्डवरील चुकीच्या नावाची दूरुस्ती करुन देण्यासाठी 2,000/- रुपये व प्लॉटची मोजणी वैयक्तीक व खासगीरित्या लगेच करुन देण्यासाठी 6,000/- रुपये लाचेची मागणी करुन उदया पी.आर.कार्डवरील चुकीच्या नावाची दूरुस्ती करुन देण्यासाठी 2,000/- रुपये आणुन दया, असे म्हणुन लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाल्याने, आज दिनांक 04.06.2021 रोजी भुमी अभिलेख कार्यालय, जालना येथे सापळा लावला असता पर्यवेक्षक भुमापक श्री. माधव ओगले यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे पी.आर.कार्डवरील चुकीच्या नावाची दूरुस्ती करुन देण्यासाठी 2,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष करुन स्विकारली असतांना, त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने भूमी अभिलेख कार्यालय, जालना येथे रंगेहाथ पकडले आहे.

लोकसेवक श्री. माधव पांडुरंग ओगले, वय 54 वर्ष व्यवसाय नोकरी पर्यवेक्षक भुमापक, उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय जालना रा. ए टु झेड शाळेजवळ इन्कमटॅक्स कॉलनी, जालना (वर्ग - 3) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास **02482-220252**, तसेच टोल फ्री क्रमांक **1064** वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. **8975762906**, पोलीस निरीक्षक मो.नं. **8390757835, 9823216788** वर संपर्क करावा.

पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना